# अंधश्रद्धा निर्मूलक कथा

**भाग– २**

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**अंधश्रद्धा निर्मूलक कथा– भाग २ : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ – २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/–

# अंधश्रद्धा निर्मूलक कथा

**भाग– २**

## अनुक्रमणिका


- बाळंतीण / ७
- प्रार्थना / २०
- पाहिजे ! काळ्या माणसांना गोरे करणारा संशोधक पाहिजे / ३२
- गाढव संघटन / ४५
- शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव / ५२
- देवसकी आणि माणुसकी / ६६
- अपघात कीं आत्मघात / ७९
- भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय / ९२
- विटाळाचें वेड / १०२
- व्रतें आणि वैकल्यें / ११६


✦✦

# अंधश्रद्धा निर्मूलक कथा

## भाग २

## १. बाळंतीण

तो गाव दहाबारा हजार हिंदु वस्तीचा. अेक पडवीसारखी धर्मशाळाही बोर्डाने बांधलेली गावच्या मध्यवस्तीपुढील वाटेच्या टोकास होती. आज त्या धर्मशाळेपाशी पाचपंचवीस लोक जमून हे करताहेत तरी काय, असें वाटेने जाताना स्वत:शी पुटपुटत, श्री. गोदास सुखे तिकडे वळले. पहातात तो अेक मरतुकडी, वाटचुकार नि वीण संपलेली अेक जख्खड गाय तिथे मटकन् बसलेली आहे आणि जमलेले ते दहापांच लोक अेकमेकांस विचारीत आहेत, 'मारलें? कोठे? कुणी? गायीला छडी मारली?'

'गायीला छडी मारली' हे शब्द अैकताच गोदास सुखे त्या लोकांस हाताने ढकलीत अेकदम गायींजवळ गेले. त्यांना पाहताच अेका मुलाने सांगितलें की, 'ही जख्खड गाय दोन चार दिवस संध्याकाळी येथे बसलेली असते. शेजारच्या अेका काम करणाऱ्या मनुष्याने वाटेत आली म्हणून तिला माझ्या समक्ष छडी मारली. मी ओरडलो नाही-नाहीतर तो मला मारता. पण तिला वाटेतून उठवून तो गेला, तेव्हा मी या दोघा-चौघा जात्यायेत्यांस तें सांगितलें. हे पहा अिथे मारलें!' असें म्हणून त्याने गायीच्या पाठीकडे बोट दाखविलें. पण तिथे वळबीळ काही दिसत नव्हता. गोदास सुखे अगदी मोठमोठ्याने बोलण्याच्या आवेशात येअून मुलास फटकारू लागले; 'चूप भित्र्या! गोमातेला छडीने मारणाऱ्या त्या माणसाचा तू शिरच्छेद कां केला नाहीस? गाय वाटेत येअून बसली होती, तर माणसाने वाट सोडून गटारांच्या बाजूने जायचें होतें. छडी मारून तिला अुठविणारा असला वाटसरू कसाअीच असला पाहिजे. बिचारी म्हातारी गाय! आअीसारखी पूज्य! तुम्ही अितके हिंदु लोक अिथे

टकमका बघत असता तिची जोपासना करण्याचा यत्न अेकजण तरी करतो आहे काय?'

असें म्हणत गोदास सुखे यांनी आपल्या अुपरण्यातील अेक गोग्रासपेटी बाहेर काढली आणि खुळखुळवीत सगळ्यांपुढे फिरवली, 'गोग्रासभिक्षा घाला!' अेकादोघांनी तीत चवली पावली टाकली.

गोदास सुखे हे अेक फिरते गोसेवक होते. पूर्वी ते अेका संस्थेच्या वतीने हिंडत. पण त्या संस्थेने त्यांचें नांव लबाड म्हणून छापलें, त्यांनी ती संस्था लबाड म्हणून छापलें, आणि आता ते स्वतंत्र पण गोसेवाप्रचार करीत करीत त्या गावास अलीकडेच आले होते. त्या गायीचें प्रकरण पाहून त्यांना थोडं मनापासून वाअीटही वाटलें. नि आपलें प्रचारकार्य प्रस्ताविण्यास हे प्रत्यक्ष अुदाहरण त्या गावी चांगलेंच अुपयोगी पडेल अशीही अटकळ त्यांनी बांधली. लगेच त्या गायीस अुठवून त्यांनी अेक दावें तिच्या गळ्यात बांधलें नि तें धरून अेक गोसेवागीत म्हणत त्या घोळक्यासह ते रस्त्याने चालले.

जें त्यांचें मूळचें नांव गोपाळराव, ते ह्या गोरक्षणसंस्थेत ते होते तोवर वापरीत असत. पण त्या संस्थेतून ते जेव्हा फुटून निघाले तेव्हा त्या संस्थेविषयी त्यांनी जे आक्षेप आणले त्यांत हाही अेक आक्षेप होता की, कोणच्याही हिंदु संस्थेने गोरक्षण संस्था म्हणविणें म्हणजे हिंदुधर्मास कलंक लावणें होय. कारण गाय ही हिंदूंची देवता. तिचें पूजन, सेवन, भजन करणें हे हिंदूंचे कर्तव्य! पण स्वत:च गोरक्षक्षकर्ता म्हणवणें म्हणजे देवतेचें रक्षण मनुष्य करतो, असा विपरीत भाव प्रकटवून त्या देवतेची थोरवी नि शक्ति मनुष्याहूनही कमी लेखणें होय; त्या देवतेची ती निंदा होय! गाय ही देवता, मनुष्य तिचें रक्षण करणारा, तिचें पालन करणारा, तिच्याहून कोणी महादेव आहे कीं काय? मनुष्याने 'मी गायीची सेवा करतो' असें म्हणणें शोभेल; 'गायीचें रक्षण करतो' असें म्हणणें म्हणजे देव दुर्बळ नि भक्त सबळ असें म्हणण्यासारखें होतें. यासाठी साऱ्या गोविषयक हिंदु संस्थांनी गोरक्षणसंस्था हें नांव टाकून गोपूजक वा गोसेवक संस्था असें म्हणावें आणि प्रत्येक कार्यकर्त्याने स्वत:स गोदास, गोभक्त, गोरज अित्यादि गायीची थोरवी व्यक्तिविणारी नांवे घ्यावीं. गोपाळ हें नांव श्रीकृष्णास शोभलें, कारण तो गोदेवतेहूनही श्रेष्ठ असा जो जगाचा पालक त्या परमेश्वराचाच अवतार होता. पण मनुष्याने स्वत:स गोदेवीचे, या 'विश्वजननी'चे पालक वा रक्षक म्हणवून घेणें म्हणजे



काय? असें सावेश प्रतिपादीत गोपाळराव सुखे यांनी भरसभेत आपलें मूळचें गोपाळ हें नांव टाकून गोदास सुखे हें नांव घेतलें होतें.

धर्मशाळेपुढे त्या गायीचा हा गौरव चाललेला असताना त्या पडवीवजा धर्मशाळेच्या आत समोरच अेक पंचवीस वर्षांची बाअी लक्तरें कमरेस गुंडाळलेलीं, जवळ अेक चिंध्यांचें बोचकें, अेक दोन खापराची भांडी, तोंड अगदी रडकुंडी झालेलें–कोणी दुरून पाहिलें, की चटकन् तोंड फिरवून घेणारी अशी–अगदी त्या गायीसारखी केविलवाणी होअून अेका कोपऱ्यात बसली होती. गायीची दया येअून गोदास सुखे कळकळताना आणि स्वहस्ते त्या गायीस वारंवार कुरवाळताना पाहून तिला दहादा वाटलें की, या दयाळू पुरुषापाशी जाअून आपणही हात पसरावा. पण ती समाजाला भीत होती. त्या गावातील काही लोकांना ती गेल्या महिन्याभर भीक मागत असता माहीत झाली असून ती बाळंतपणास टेकलेली दिसत असल्यामुळे तिच्याविषयी भल्याबुऱ्या गोष्टीही गावअड्ड्यावर दबून दबून लोक बोलत आणि तिला घरापुढेही बसू न देता शिव्या देअून हुसकून देत. म्हणून ती दबून बसली होती. पण त्या नव्या गोसेवक बुवांच्या दयाशीलतेचा आसरा त्या जख्खड गायीस देखील मिळाला–गायीहून गाय झालेल्या मलातर मिळेलच मिळेल! अशी योग्य अटकळ बांधून त्या गायीची मिरवणूक चालली असता लटपटत्या पायांनी ती आसन्नप्रसवा स्त्री, बुवा थोडे रस्त्याच्या कडेस झालेले पाहताच त्यांच्यापुढे पदर पसरून अुभी राहिली.

'मी चार दिवसांची भुकी! बाळंतपणास टेकलें आहे! मला दोन पैसे–!'

तिचें ते वाक्य पुरें होण्याच्या आधीच बुवा चवताळले.

'भिकारडे, ह्या गोमातेच्या भुकेलाच पुरेसे पैसे जमत नाहीत; तिथे तू माणसासारखें माणूस–जा, काबाडकष्ट कर नि पोट भर! गायीच्या तोंडचा घास हिसडून स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यास तुला लाज वाटत नाही? माणुसकी आहें, की नाही तुला? अहो आपल्या देशाचे कोट्यवधि रुपये ह्या अैदी भिकाऱ्यांस पोसण्यास मातीत मिळतात. आणि या बिचाऱ्या जख्खड गोमाता भुकेने तडफडत राहतात.'

अितक्याच बुवांच्या कानाशी अेकाने त्या स्त्रीच्या पोटाकडे बोट दाखवून कागाळी केली. त्यासरशी सात्त्विक संतापाने अुसळून बुवा ओरडले,

‘हुसका तिला! अस्सें काय? काळतोंडी!’ असे हातवारे करीत लोक गात असलेल्या पदाच्या पालुपदाची वेळ आलेली पाहून बुवांनी आपल्या अुंच व घोगऱ्या आवाजाचीही त्या पालुपदात भर टाकली.

‘गायीस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ।।’’

दोघाचौघांनी तेवढ्यात त्या बाअीची चेष्टाही चालविली. पण अितक्यात रामभाअू वैद्य तेथे आले आणि लोकांस तसें न करण्याविषयी सांगून बाअीस आश्वासीत विचारू लागले, ‘तू कुठली बाअी! सासरमाहेरचें कोणी नाही का तुला?’ रामभाअू तिच्याशी हें विचारतात न विचारतात तोंच त्यांच्या दहापांच स्नेह्यांनी त्यांचा हात ओढीत अेकच गोंगाट केला, ‘हा! हा! रामभाअू तिच्याशी काय बोलता? तुमच्यासारख्या प्रतिष्ठित माणसांवर नसतें किटाळ येअील. पुढें चला–चला–आम्ही सांगतो सारें!’

‘गायीस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ।।’ ह्या पालुपदाने सारा रस्ता दुमदुमवीत नि येत्याजात्यास अडवून पै–पैसा काढीत, त्या जख्खड गायीची मिरवणूक पुढे चालली.

समोरून अेक भारेवाली हिरव्यागार गवताचा भारा घेअून येत होती. वाटेच्या अगदी कडेने ती चालली होती की त्या गायीच्या मिरवणुकीची वाट अडू नये! गोदास सुख्यांचें लक्ष त्या गायीच्या आधीच त्या हिरव्या भाऱ्याकडे गेलें. त्यांनी खूण करताच दोघा–चौघांनी बाअीला अडवून ‘भारा टाक’ म्हणून दरडावलें. ‘पैसे कोण देणार?’ हें तिने विचारताच अेकदम गलका अुठला, ‘गोग्रास गाय आहे ही ! धर्माच्या गायीच्या गवताचे पैसे मागतेस काय?’

‘पण मग घरच्या मुलालेकरांना तांदूळ कशाचे नेअू दादा! खातील काय तीं आज?’

‘आणि ही गोमाता काय खाअील! गोदेवीच्या नांवे लेकरांना अुपास करू देत आजची रात्र! स्वर्गात तुला कामधेनु मिळेल!’ बुवांनी समाधान केलें.

‘बघता काय? घ्या तो भारा तिचा!’ असं म्हणत दोघे तिघे भारा ओढू लागले. तेव्हा तिला आपला बचाव करण्याची शेवटची युक्ति सुचून ती म्हणाली, ‘हा, हा! मी म्हारीण! विटाळाल! दूर व्हा!’



तों तिच्या अटकळीचा परिणाम अगदी अुलट झाला. झोंबून भारा ओंढणारे ते लोक चेकाळले आणि तिच्या तोंडात देअून ओरडले, ‘तुझी पहिल्याने दातखीळ बसली होती काय? चांडाळणी! विटाळ झाला ना आम्हांला!’

तिला सोडविण्यास रामभाअू धावत आले. समाजास गोंजारून म्हणाले, ‘त्या गायीसारख्या अेका पशूला मघाचे कुरवाळता आहा–आणि माणूस असता, त्याचा विटाळ मानता? ही काय भूतदया कीं धर्म?’

हें अैकताच बुवा चिडले, ‘अहो दीडशहाणे, गायीला पशु म्हणताना तुमची जिव्हा झडत कशी नाही? गाय पशु असली तरी देव विश्वव्यापी; पशूंत नाही कीं काय?’

बुवांस शांतविण्यासाठी रामभाअू त्यांच्या पाठीवर हळूच हात फिरवीत म्हणाले, ‘तर मग जो विश्वव्यापी देव पशूंतदेखील आहे, तो माणसांत नाही काय? आणि महार माणूस नाही काय?’

ह्या प्रश्नापेक्षा रामभाअू महाराच्या स्पर्शाने विटाळले असता आपल्यास शिवून आपणासही विटाळवीत आहेत, याचाच जास्त संताप आल्यासारखें करून, त्या बिनतोड प्रश्नाने झालेली धांदल बुवांनी लपविली. त्या प्रश्नाकडून लोकांचेंही लक्ष काढून, लोकांस पटणारी विटाळाचीच बाजू पुढे धरावी म्हणून बुवा रामभाअूंचा हात हिसडून गरजले, ‘भंगी आहात भंगी! महाराला म्हणे शिवा! शिव शिव! कोण पाखंड!’ लगेच बुवांनी गायींचे शेपूट डोळ्यांवर फिरविले आणि त्या पशूच्या खुराखालची मूठभर माती–तें पावक गोरज, समाजाच्या अंगावर फेकून स्वत: तो अंगारा लावून त्या महार माणसाच्या झालेल्या विटाळाचें तात्पुरतें प्रायश्चित केलें. गायीच्या तोंडात त्या हिरव्या गवताचे जुडग्यावर जुडगे स्वहस्ते चारीत मिरवणूक पुढे चालली, ‘गायीस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ।।’

वाटेत मुसलमान मिरवणुकीत सगळ्यांस खेटत येत जात होते. काही फिदीफिदी हसून टवाळी करीत होते. त्यांचा विटाळ कुणाला झाला नाही, त्यांच्या वाटेस कुणीं गेलें नाही.

थोड्या वेळाने ते गोदासबुवा ज्या अेका गोभक्त बाअीच्या घरी अुतरले होते त्या घराशी आले. त्या बाअीचा मुलगा घरचा कर्ता, हिंदु संघटनाचा अभिमानी पण बुद्धिवादी (Rationalist) तरुण वकील. आअीच्या भिडेने त्याने गोदासबुवांना घरीच